# ऋणनिर्देश

''गौरी देशपांडे'' यांच्या ''गोफ व उत्खनन या कादंबऱ्यातील स्त्री चित्रणाचा चिकित्सक अभ्यास'' हा विषय एम्. फिल. च्या शोध प्रबंधासाठी निवडण्यामागे मराठी विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीट तसेच मार्गदर्शिका डॉ. सौ. नलिनी महाडीक यांचे प्रत्यक्ष चर्चेतून मार्गदर्शन लाभले व हा विषय निश्चित केला.

शिक्षणाने स्त्रीचे मन-विचार जागृत झाले आहेत. अनुभवाचा आवाका विस्तारल्यामुळे ती निर्भिडपणे वाचू, लिहू शकते असे आपल्याला वाटत असले तरीही अजून मनातले विचार मंथन, घुटमळ ती संपूर्णपणे उघड करु शकत नाही, ही वस्तुस्थितीही नाकरता येत नाही.

माझे आतापर्यंतचे सर्व शिक्षण कर्मवीरांच्या रयत शिक्षण संस्थेच्या छत्रछायेत झाल्याचे अभिमानाने नमूद करावेसे वाटते. आता एम. फिल. साठी शिवाजी महाविद्यालयातील मराठी विभागाच्या प्रमुख म्हणून कार्यभार सांभाळत असलेल्या प्रा. डॉ. सौ. नलिनी महाडीक या मार्गदर्शक म्हणून लाभल्या आहेत.

त्यांच्या स्वभावातील अभ्यासू वृत्ती, वक्तशीरपणा, कर्तव्यातील निष्ठता इ. गुण माझ्या प्रबंध लेखनाच्या कार्यात प्रेरणादायी ठरले. त्या गुरुस्थानी लाभल्याने, त्यांचे ऋण जतन करण्याचे मी भाग्य समजते.

लग्नानंतरही शिक्षण घेण्याची माझी इच्छा कृतीत उतरवण्यासाठी प्रयत्नच नव्हे तर प्रोत्साहन देऊन सर्वतोपरी सहकार्य करणारे हात ! म्हणजे माझे नाथ ! माझ्या जीवनाचे ते सहप्रवासी आहेतच शिवाय सहशिल्पकारही आहेत हे प्रामाणिकपणे कबूल करावेसे वाटते. त्यांचे आभार, ऋण शब्दात मानणे अशक्य म्हणून ते सारे भावगंध हृदयाला अर्पण.

गौरीताईंच्या मैत्रिण 'दीपा गोवारीकर' यांच्या प्रत्यक्ष भेटीतून गौरी ताईंच्या स्वभावाचे काही पैलू समजण्यास मदत झाली. तेव्हा त्यांचेही आभार. गौरीताईंना प्रत्यक्ष भेटणे शक्य नाही. पण त्यांना जवळून पहाणारी, काही काळ त्यांचा सहवास लाभलेली व्यक्ती भेटणे हेही नसे थोडके !

दीपा गोवारीकर यांची भेट घडवून आणणाऱ्या माझ्या स्नेही डॉ. सौ. ज्योत्स्नाताई कोल्हटकर

यांचेही आभार. त्या सातारा नगर वाचनालयाच्या कार्यवाह आहेत. त्यांच्या सहकार्यामुळे वाचनालयातील स्टाफची मदत मिळाली. त्यांचेही आभार. माझ्या शैक्षणिक जीवनातील प्रेरणा असणाऱ्या आमच्या स्नेही सौ.ठोसरताई त्यांचेही मन:पूर्वक आभार.

जीवनातील अति दुखद प्रसंगी माणसाचे मनोबल ढासळते, अशा वेळी सांत्वनपर शब्दांनी ते मनोबल पुन्हा उभे करण्याची गरज असतेच. याच दृष्टिकोनातून कऱ्हाडचे डॉ. कन्हैय्यालय कुंदप सर, आमचे स्नेही, यांनी माझ्या जीवनातील अति दु:खद प्रसंगी माझी खूपच ढासळलेली मनोवृत्ती वडीलधाऱ्या शब्दांची पखरण करुन उभारण्याचा प्रयत्न केला. प्रबंध लेखनावेळी त्यांनी दिलेला धीर व प्रेरणा विसरण्याचा कृतघ्नपणाही करता येणार नाही. मला शिवाजी कॉलेजमधील ग्रंथालयातील लोकांचेही चांगले सहकार्य मिळाले त्यांचेही आभार. मा. प्राचार्य के. एस. मोहीते सर यांनी प्रेरणादायी शब्द दिले त्याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार. श्री.जे.आर.जाधव सर यांनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार.

या प्रबंधाचे तत्परतेने टंकलेखन व आकर्षक बांधणी करुन देणारे 'मे.ज्योतिर्लिंग टायपिंग सेंटर, कोरेगावच्या ' सौ.प्रांजली रा. खटावकर यांचे ही आभार.

मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. त्याच्या कार्याची मान उंचावण्यासाठी त्याला अनेकांच्या सहकार्याची आवश्यकता असतेच. त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार. ईश्वरकृपेने व अनेकांच्या सहकार्याने प्रबंधास पूर्णत्व आले. ।। तेथे कर माझे राहो जुळलेले ।। त्यामागील सहकार्य करणाऱ्या हातांना प्रेरणा व सदिच्छा देणाऱ्या मनांना धन्यवाद !

सातारा

दिनांक - २७ जून २००५ सौ.जयमाला जगन्नाथ जाधव

# प्रबंध लेखनाचा हेतु व त्यामागील भूमिका

मानवी समाज काळानुसार बदलत आला. सुशिक्षित झाला. सुसंस्कृत म्हणवून घेऊ लागला. सर्व क्षेत्रात पुरूषाच्या बरोबरीने स्त्री काम करू लागली . तरी तिचा दुय्यम दर्जा बदलला नाही. पुरूषप्रधान संस्कृतीची मानसिकता बदलली नाही. मात्र काही विचारवंत समाजसुधारकांच्या व कामगार जगतात स्त्री हक्काची जाणीव झाली. स्त्रिया आर्थिकदृष्टया स्वावलंबी झाल्या. त्यांना जाणीव जागृती झाली. औदयोगिक क्षेत्रात स्त्री कामगारांचे संघटन होऊ लागले. सुशिक्षित नोकरी करणारी स्त्री आपला हक्क वापरू लागली. साहित्यात त्या जाणीवांचे प्रतिबिंब उमटू लागले. स्त्री स्वातंत्र्याची चळवळ आकार घेऊ लागली. स्त्रीवादी साहित्य लिहिले जाऊ लागले. समाजात स्त्री पुरूष समानता विचारांचे मंथन सुरू झाले. पाश्चात्य जगातून पौरात्य जगात या चळवळीचा जोर झपाटयाने प्रसारित झाला. स्त्रीचे शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक अंगाने कसे शोषण केले जाते याची मीमांसा मांडली जाऊ लागली. तिचे मानवी हक्क कायदयाने प्रस्तापित्र केले जाऊ लागले. हुंडाबंदी, व्दिभार्या प्रतिबंधक कायदा, वारसा हक्क कायदा इत्यादी कायदयाच्या अंगाने जसे तिच्या मानवी हक्कांचे संरक्षण केले गेले तसे विचार–प्रसरणाच्या माध्यमातून–वृत्तपत्रीय लेखन आणि ललित साहित्यातून स्त्रीहक्काचा प्रसार होऊ लागला. त्यामध्ये स्त्री शोभेची वस्तु नाही, जाहिरातीची वस्तु नाही, खरेदी–विक्रीची वस्तू नाही. तसेच विज्ञानयुगामुळे गर्भलिंग चिकित्सा होत असली तरी त्या शोध सुविधेतून स्त्रीभ्रूण हत्या केली जाऊ नये म्हणून साहित्यकृतींच्या माध्यमातून समाज मनावर संस्करण केले जाऊ लागले. या स्त्री जाणीवा मांडल्या जाऊ लागल्या. स्त्रीयांचे स्वत: संबंधीचे साहित्य, ज्यातून 'स्व' चा शोध घेतला आणि जे 'स्व' त्वाच्या जाणीवेने लिहिलेले आहे असे साहित्य 'स्त्रीवादी' साहित्य मानले गेले. विशेषत: १९७० नंतर या साहित्याला बहर आला मराठी साहित्य विश्वात या काळात गौरी देशपांडे, कमल देसाई, मेघना पेठे इत्यादी लेखिकांनी कथा–कादंबरीच्या माध्यमातून प्रभावी लेखन केले.

मराठी साहित्यातील स्त्रीवादी लेखनावर संशोधनात्मक लेखन चिकित्सा फारसी झाली नाही. स्त्रीवादी लेखनाचा कालखंडही फार मोठा नाही. तरीही जे लेखन झाले आहे त्याची 'स्त्रीवादी' म्हणून मीमांसा होणे आवश्यक झाले आहे. 'स्त्रीवादी' जाणीवा पुरूषप्रधान संस्कृतीच्या जगभरच्या समाज–समूहात काळानुसार निर्माण झाल्या तरी त्याचा समाज संघर्षाच्या घटितातून आणि साहित्यकृतीच्या

रूपातून प्रभावी उदभव झाला तो पाश्चात्य देशात. त्यामुळे 'स्त्रीवाद' पाश्चात्य देशातून आला असे म्हटले जाते. तसे पाहता म.फुले यांच्या काळात ताराबाई शिंदे यांनी जो 'स्त्री–पुरूष तुलना' हा निबंध लिहिला त्यात स्त्रीवादी जाणीवा स्पष्ट आहेत. पण आपल्या समाजाने व साहित्याने त्याचा पाठपुरावा सातत्याने केला नाही.

गौरी देशपांडे यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, त्यांच्या कुटुंबाचे झालेले सांस्कृतिक परिवर्तन, गौरी देशपांडे यांचे एकूण व्यक्तिमत्व त्यांचे पाश्चात्य देशातील वास्तव्य इ. एकूण घटकांचा त्यांच्या कादंबरी लेखनावर पडलेला प्रभाव पाहता त्यांचे कादंबरी लेखन 'स्त्रीवादी' या संकल्पनेशी नाते सांगणारे आहे, याची खात्री पटते. म्हणून एम.फिल. (मराठी) च्या पदविकेला संशोधनासाठी 'गोफ'आणि 'उत्खनन ' या दोन 'स्त्रीवादी' विचाराचा प्रभाव असणा–या कादंब–या निवडल्या.

गौरी देशपांडे यांच्या 'गोफ' आणि 'उत्खनन ' या दोन्ही कादंब–या समकालीन कादंबरीपेक्षा वेगळया आहेत शिवाय समकालीन 'स्त्रीवादी ' कादंबरी लेखनापेक्षाही काही वेगळेपण या कादंब–यांमध्ये आहे. कारण आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगाने परिवर्तीत झालेल्या त्यांच्या या कादंब–यांमध्ये लेखिकेच्या व्यक्तिमत्वाचे पारदर्शीपण उमटलेले आहे. त्यांच्या कादंबरी लेखनात व्यक्तिस्वातंत्र्य, माणूसपण, स्त्रीजाणीवा इ. चा अविष्कार अतिशय जाणतेपणाने झालेला आहे. समकालीन समाज आणि समकालीन स्त्रीवादी कादंबरी यांच्याही पुढे जाणारी व आपले वेगळेपण स्पष्ट करणारी, वाचकास अंतर्मुख करणारी गौरी देशपांडे यांची लेखनपध्दती संशोधनासाठी आव्हानात्मक आहे म्हणून हा विषय निवडला गेला.